# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः01.04.2024** **वारःसोमवार**

---

1. देशाचे माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशातून केला निवडणूक प्रचाराचा प्रारंभ
3. इंडिया आघाडीच्या नेत्यांचा दिल्लीच्या रामलीला मैदानावर महामोर्चा आणि
4. लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीची अकरा उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

**भारतरत्न**

देशाचे माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांना काल भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अडवाणी यांच्या नवी दिल्ली इथल्या निवासस्थानी जाऊन हा सन्मान प्रदान केला. यावेळी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी उपराष्ट्रपती एम व्यंकय्या नायडू, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा आणि अडवाणी यांचे कुटुंबीय उपस्थित होते. अडवाणी हे देशाच्या राजकारणातील एक प्रमुख नेते असून सात दशकांहून अधिक काळ त्यांनी अखंड समर्पण आणि विलक्षण कौशल्यानं देशाची सेवा केली आहे, भारताच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठी त्यांनी अथक संघर्ष केला आणि देशाला विकासाच्या मार्गावर नेण्यात ते यशस्वी ठरले असं राष्ट्रपतींनी त्यांच्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न मिळताना पाहणं अत्यंत सुखदायक आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. गेल्या अनेक दशकांपासून त्यांच्याबरोबर खूप जवळून काम करण्याची संधी मिळाल्याचा अभिमान वाटतो, असंही मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**भाजप-मेरठ-प्रचारसुरु**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल उत्तर प्रदेशातील मेरठमधून भाजपाच्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला. भाजपाने अभिनेते अरुण गोविल यांना मेरठ लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. 2024ची लोकसभा निवडणूक केवळ सरकार बनवण्यासाठी नाही तर भारताला विकसित राष्ट्र आणि जगातील तिसरी सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनवण्यासाठी आहे असं प्रतिपादन मोदी यांनी जाहीर सभेला संबोधित करताना केलं. भारताची अर्थव्यवस्था जेव्हा अकराव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर आली तेव्हा 25 कोटींहून अधिक लोकांची गरिबी संपुष्टात आली. जेव्हा भारत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल, तेव्हा गरिबीचे पूर्णपणे उच्चाटन होईल आणि देशातील मध्यमवर्ग भारताच्या विकासाला चालना देईल असं मोदी म्हणाले. गेल्या दहा वर्षांत भाजपाप्रणीत सरकारच्या काळात झालेल्या कामांचा त्यांनी यावेळी लेखाजोखा मांडला.

**इंडिया आघाडी**

केंद्र सरकार शासकीय यंत्रणांचा गैरवापर करत असल्याचा आरोप काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी काल नवी दिल्लीत केला. इंडिया आघाडीनं रामलीला मैदानावर काढलेल्या महामोर्चामध्ये ते बोलत होते. ही निवडणूक लोकशाही आणि संविधान वाचविण्यासाठी असून विरोधकांनी एकजुटीने लढलं पाहिजे असं ते म्हणाले. ज्येष्ठ नेते शरद पवार, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे अनेक वरिष्ठ नेते या महामोर्चात सहभागी झाले होते. अरविंद केजरीवाल, हेमंत सोरेन यांच्या अटकेचा या सभेत निषेध करण्यात आला.

**<u>वंचित</u>**

वंचित बहुजन आघाडीने लोकसभा निवडणुकांसाठी आपल्या अकरा उमेदवारांची दुसरी यादी काल रात्री जाहीर केली. त्यामुळे वंचित आघाडीच्या महाराष्ट्रातील उमेदवारांची संख्या 19 वर पोहचली आहे. कोल्हापूर आणि नागपूर लोकसभा मतदारसंघात काँग्रेसला पाठिंबा देणार असल्याचं वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी याआधीच  जाहीर केलं होतं. वंचित आघाडीनं हिंगोलीमध्ये - बी.बी.चव्हाण, लातूरमध्ये - नरसिंहराव उदगीरकर, सोलापूरमध्ये - राहुल गायकवाड, माढा इथून - रमेश  बारसकर, साताऱ्यातून - मारूती जानकर, धुळे - अब्दुल रहेमान, हातकणंगले - दादासाहेब उर्फ दादागौडा चवगोंडा पाटील, रावेर - संजय ब्राम्हणे, जालना - प्रभाकर बकले,  उत्तर मध्य मुंबई - अबुल हसन खान, आणि रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून - काका जोशी यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

**<u>आंबेडकर-नागपूर</u>**

महाविकास आघाडीत वंचित बहुजन आघाडीला जागा देण्याबाबत त्यांच्याकडून कोणताही निर्णय होत नव्हता, त्यामुळेच आघाडीतून बाहेर पडायचा निर्णय घेतल्याचं वंचितचे प्रकाश आंबेडकर यांनी काल नागपूरमध्ये वार्ताहर परिषदेत स्पष्ट केलं. दरम्यान भाजपाचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल  पश्चिम नागपुरातील दाभा इथून आपल्या लोकसंवाद यात्रेला सुरुवात केली. तर काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांनी शनिवारी नागपूर मध्य विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्या मेळाव्याला संबोधित केलं.

**<u>माने-माळी-कॉंग्रेस प्रवेश</u>**

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे माजी आमदार दिलीप माने आणि लातूरचे वंचित बहुजन आघाडीचे नेते जगदीश माळी यांनी काल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला.  माने यांनी 2019 च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस सोडून शिवसेनेत प्रवेश केला होता.

**<u>मस्ट-उद्घोषणा</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम आकाशवाणीवरुन आजपासून सादर केला जाणार आहे. संध्याकाळी सव्वा 7 ते साडे 7 वाजेदरम्यान आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्ट चॅनलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्त विभागांच्या सोशल मीडिया आणि युट्युब चॅनलवरही हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<u>गीता धनावडे-इस्त्रो निवड</u>**

पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता नववीमध्ये शिकणाऱ्या गीता धनावडे या विद्यार्थिनीची इस्त्रोच्या युविका 2024 अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निवड झाली आहे. या यशानंतर  गीतानं आकाशवाणीकडे आपलं मनोगत व्यक्त केलं.....

**<u>सतार तंबोरा</u>**

सांगली जिल्ह्यातील मिरजेच्या सतार आणि तंबोऱ्याला भौगोलिक मानांकन मिळालं  आहे. त्यामुळे मिरजेतील सतार आणि तानपुरा या पारंपरिक वाद्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ओळख मिळणार आहे. त्याचबरोबर या भागातील कलाकार आणि उत्पादकांना त्याचा मोठा लाभ होणार आहे.

**<u>ईस्टर संडे</u>**

प्रभू येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा दिवस ईस्टर संडे काल राज्यात सर्वत्र साजरा झाला. ख्रिश्चनधर्मीयांच्या चाळीस दिवसांच्या उपवासाची सांगताही काल झाली. ईस्टर संडेनिमित्त पुण्यातील विविध चर्चमध्ये विशेष प्रार्थना आयोजित करण्यात

आली होती. काही चर्चमध्ये रक्तदान, नेत्र तपासणीसह आरोग्य शिबिर भरवण्यात आलं. ईस्टरनिमित्त गरिबांना अन्नदान आणि अन्य दान-धर्म करण्यात आल्याची माहिती पुणे धर्म प्रांताचे बिशप अँड्र्यू राठोड यांनी दिली.

**एकनाथ षष्ठी**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथं संत एकनाथ महाराजांच्या नाथषष्ठी सोहळ्याला काल प्रारंभ झाला. मंदिर संस्थानचे अध्यक्ष संदिपान भुमरे यांच्या हस्ते नाथांच्या समाधीची अभिषेक पूजा करण्यात आली. राज्यभरातून आलेल्या शेकडो भाविकांनी गोदावरी पात्रात स्नान करून नाथांच्या समाधीचं दर्शन घेतलं. मानाच्या दिंड्यांची मिरवणूक काढण्यात आली.

**सिद्धार्थ बेन्द्रे**

आकाशवाणी पुणे केंद्राचे उद्घोषक सिद्धार्थ बेन्द्रे 30 वर्षांच्या सेवेनंतर काल स्वेच्छानिवृत्त झाले. प्रथम आकाशवाणी मुंबई केंद्रावर आणि त्यानंतर पुणे केंद्रावर अशी एकंदर 34 वर्षे उद्घोषक म्हणून त्यांनी कार्य केलं. मान्यवरांच्या मुलाखती, महत्वाचे बाह्य प्रसारण कार्यक्रम, स्पष्ट आणि उत्स्फूर्त सादरीकरणामुळे श्रोतृवर्गात त्यांना विशेष लोकप्रियता लाभली. आकाशवाणी पुणे केंद्राच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बेंद्रे यांना नुकताच समारंभपूर्वक निरोप देण्यात आला.

**कोकणरेल्वे-झा**

संतोष कुमार झा ह्यांची कोकण रेल्वेच्या अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकपदी नेमणूक झाली आहे. आज नवी मुंबईतल्या बेलापूर इथल्या मुख्यालयात ते पदभार स्वीकारणार आहेत.

**दिव्यांग सर्वेक्षण**

राज्यातील दिव्यांगाची आकडेवारी मिळवण्यासाठी राज्यभरात दिव्यांगाची माहिती संकलित केली जाणार आहे. सर्वेक्षणासाठी दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. या सर्वेक्षणातून दिव्यांगांची राज्यात नेमकी किती संख्या आहे हे स्पष्ट होणार आहे. 2011 च्या जनगणनेनुसार 29 लाख 63 हजार राज्यात दिव्यांग होते. सर्वेक्षणामध्ये एकसमानता राहण्यासाठी शासनाकडून प्रत्येक जिल्हयाला प्रश्नावली देण्यात येणार आहे असं दिव्यांग कल्याण विभागाच्यावतीनं सांगण्यात आलं.

**एसटी**

एसटीच्या पुणे विभागातील पाच बस आगार पूर्णपणे इलेक्ट्रिक केले जाणार आहेत. यात स्वारगेट, इंदापूर, मंचर, आळंदी आणि सांगवी आगारांचा समावेश आहे. स्वारगेट डेपोमधून 137, सांगवीतून 30, इंदापूरमधून 29, मंचरमधून 27 तर आळंदीमधून 28 अशा एकंदर 251 ई-गाड्या धावणार आहेत.

**तापमान-सोलापूर, कोल्हापूर**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात गेल्या आठ ते दहा दिवसापासून उन्हाचा पारा सातत्याने वाढत असून गेल्या दोन दिवसापासून दिवसभर कडक ऊन आणि रात्री हलका पाऊस असं वातावरण आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील उन्हाचा पारा 38 अंशावर पोहोचला आहे. उन्हाच्या झळांनी नागरिक हैराण झाले असताना काल संध्याकाळी अनेक ठिकाणी पाउस झाला.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आज हवामान कोरडे राहण्याची शक्यता असून रात्री उष्मा राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार